


ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 4 | Jan - 2016





# भारतीय संगीतातील घराणी : एक परंपरा

प्रा. विवेक संतोषराव चापके
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.

**सारांश –**

भारतीय संगीताचे वैशिष्ट्य असे की, ते संपूर्णपणे राग पध्दतीत सामावलेले आहे. जगातील सर्व संगीत पध्दतींचा अभ्यास केल्यास असे आढळून येईल की, सर्वात वेगळी व सर्वश्रेष्ठ अशी संगीत पध्दती ही घराणेदार शोधनिबंधात घराण्यांचाा उगम, इतिहास घराण्याचे स्वरुप, घराण्यांचे कार्य, घराण्यांचे भविष्य आदि गोष्टींचा अंतर्भाव, आजची स्थिती यासर्व विषयांवर उहापोह केलेला आहे.

## प्रस्तावना :

भारतीय शास्त्रीय संगीतात ''घराणी'' या प्रकारला एक वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. शास्त्रीय संगीतात गायन कलेला म्हणजेच कंठ संगीताला प्रथमपासूनच महत्त्व दिलेले आहे आणि अनन्य साधारण असे स्थान आहे. जगातील सर्व संगीत पध्दती अभ्यासल्यास आपल्याला संगीतातील घराणी किंवा घरंदाज गायकी असा शब्दप्रयोग केवळ भारतीय संगीतातच आढळून येईल. कारण जगातील सर्व पध्दतीतील स्वर – लयीची सर्वश्रेष्ठ मांडणी केवळ भारतीय संगीत पध्दतीतील राग या क्रियेतच येते आणि राग गायन हे या पध्दतीतील एक माध्यम आहे. प्रत्येक कलाकार आपली कला सादर करतांना आपल्या प्रतिभेने राग विस्ताराची एक खास पध्दत किंवा शैली निर्माण करतो. जेव्हा तो ही त्याची खास शैली निर्माण करत असतो तेव्हा तो स्वतः त्या कृतीचा समीक्षक असतो. काही अनावश्यक भाग काढून टाकणे व नवीन भाग समाविष्ट करुन रसिकाच्या नजरेतून त्या कलाकृतीचा पारख करणे आदि मार्गांचा अवलंब करुन तो त्या कलाकृतीस अधिकाधिक सुंदर व वैशिष्ट्यपूर्ण व काही प्रमाणात थोडी वेगळी करण्याचा प्रयत्न करीत असतो. आपल्या कलाकृतीच्या संबंधात कलाकाराच्या मनात विश्वास निर्माण झाल्यावर तो ती रसिकांसमोर सादर करतो. रसिकांना त्या कलाकृतीने आनंद मिळाल्यास कलाकाराला समाधान मिळते. रसिक श्रोत्यांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळू लोगतो आणि मग सदर कलाकृती किंवा शैली आत्मसात करण्यासाठी त्याच्याकडे शिष्यवर्ग वाढू लागतो. ही खास शैली प्राप्त झालेले शिष्य पुढे आपल्या शिष्यांना त्याच शैलीची

तालीम देत राहतात आणि ही नवी शैली गुरु, शिष्य, प्रशिष्य त्यांचे शिष्य अशी दिर्घकाळ चालत राहते. ती एक परंपरा बनते. ही परंपरा, संप्रदाय म्हणजेच घराणी होत''.

घराणे याचा शब्दशः अर्थ 'घर' असा होतो. घरात राहणाऱ्या परिवास किंवा घराण्यात वंशानुगत राहणाऱ्या परिवारास घराणे असे म्हणतात. घराण्याचा दुसरा अर्थ 'रुढी' देखील होतो. पं. शारंगदेवाने आपल्या 'संगीत रत्नाकर' या ग्रंथात सुखप्रदाय शब्दाचा संबंधही परिवार किंवा शिष्य – प्रशिष्य परंपरेकरीताच आहे. असे साांगितले आहे. पं. बबनराव हळदणकर यांनी दिलेली घराण्याची व्याख्या Gharana does not merely mean a family tree, but a gayaki which has a discipline, rule and aesthetic approach, in presenting a rage in particular manner. जेष्ठ समीक्षक प्रा. मिलिंद मालशे म्हणतात, Gharanas are like Trade & Guides nurturinng speecific and specialized skills and fortifying them within the family. Each Gharana acts as a store house of different ragas, very selected and cherish old compositions.

## घराणे पध्दतीचा इतिहास व परंपरा

साधारण 15 व्या शतकाच्या अखेरीपर्यंत किंवा 16 व्या शतकाच्या 15–20 वर्षा आधी म्हणजेच पूर्वार्धापर्यंत देखील घराणे पध्दतीचे नामोनिशाण नव्हेत. 16 व्या शतकात भारतीय संगीतात धृपद, धमार गायन पध्दती उत्कर्षास पोहचली होती आणि याच धृपद–धमाराच्या उत्कर्षाच्या काळात घराण्यांचा आरंभ झाला. या काळाच्या धृपद गायनाचे विविध प्रकार ''धृपद बानी'' म्हणून अस्तित्त्वात होते आणि हेच धृपद बानी, प्रकार हे ''घराणा गायकी''चे उगमस्थान मानावे लागेल. सम्राट अकबराच्या दरबारात चार सुप्रसिध्द संगीततंज्ञ होते व त्या प्रत्येकाची स्वतःची अशी धृपद गायन शैलीला गौडीय किंवा 'गोबरहार बाणी' असे नाव पडले ब्रजचंद ब्राम्हण हा डागुर गावचा राहणारा होता म्हणून त्याच्या गायन शैलींला डागुरबानी हे नाव पडले. श्रीचंद रजपूत हा नौहार गावचा असल्याने त्याची गायन शैली नौहार बानी म्हणून प्रसिध्दीस आली. राजा समोनसिंह हा खंडहार येथील राहणारा म्हणून त्याच्या शैलीला खंडहार बानी हे नाव पडले. विशिष्ट रीत किंवा पध्दत अवलंबवणे याला बानी असे म्हणता येईल. जी गायकी म्हणून संबोधली जाते. घराणे किंवा गायकीमध्ये गान–रीतीपेक्षा गानविचार महत्त्वाचा असतो. 18व्या शतकार्पत धृपद – धमारची लोकप्रियता होती परंतु उत्तरार्धानंतर हळुहळु कमी होवू लागली व कलेचा मुक्त अविष्कार व आकर्षकपणा असलेली ख्याल गायकी लोकप्रिय होवू लागली व ती हळूहळू सर्वसामान्य श्रोत्यांच्या मनात आपले स्थान निर्माण करु लागली. 20 व्या शतकाच्या प्रारंभापर्यंतच जवळपास संपूर्ण उत्तर हिंदूस्थानी संगीत क्षेत्र काबीज करुन घेतले याच काळात भारतात राजनैतिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती देखील बदलली. मोगल, मराठी सत्ता नष्ट होवून इंग्रजी सत्ता सर्व हिंदुस्थानावर स्थिर झाली. ब्रिटीश येथील समाजसंस्कृती, कला या सर्वांना तुच्छ लेखत. संगीतावरही त्याचा परिणाम झालाच आणि संगीताचा राजाश्रय संपुष्टात आला. राजाश्रम सुटल्यावर गायक, वादक, नर्तक आश्रयासाठी इकडे–तिकडे भटकू लागले. त्यावेळी ग्वाल्हेर, रायपूर, इंदौर, बडौदा, देवास, रामपूर रेवा इ. संस्थानांनी त्यांना आश्रय दिला व संस्थाने संगीताची सुप्रसिध्द केंद्र बनली. या काळात मुसलमान कलाकारांचे प्रमाण जास्त असल्याने त्यांची कला त्यांनी त्यांची मुले व नातेवाईक यांनाच शिकविली. या काळात अनेक घराणी निर्माण होवू लागली व त्यातून गंडाबंद शागीर्द देखील धृपदबानी प्रमाणे ख्याल शैलीतही जी घराणी निर्माण झाली आणि ती घराणी निर्माण करणारा मुळ कलाकार हा जेथील निवासी म्हणजेच राहणारा होता किंवा ज्याा संस्थानचा आश्रित होता, त्या संस्थानच्या नावाने ती मान्यता पावली. जसे, स्व. नथ्थन पीरबक्ष हे ग्वाल्हेर घराण्याचे प्रवर्तक मानले जातात. त्यांचे पुत्र व शिष्य कादरबक्ष हे ग्वाल्हेरचे राजे स्व. दौलतराव शिंदे यांचे आश्रित होते. तसेच कादरबक्ष यांचे तीन पुत्र हस्सू खॉ, हददू खॉ, नथ्थु खॉ हे कलाकार देखील ग्वाल्हेरच्या दरबारात आश्रित होते आणि पुढे वासुदेव जोशी, बालकृष्णबुवा इंचलकरजीकर, रहिमत खॉ, महंमद खॉ, पं. विष्णू दिगबंर पलुस्कर आदींनी ही परंपरा पुढे चालू ठेवली म्हणून त्यांची परंपरा ग्वाल्हेर घराणे म्हणून प्रसिध्द पावली.

## संगीतातील घराणी

जास्त प्रमाणात रसिकमान्य अशी पाच मुख्य घराणी अजूनपर्यंत अस्तित्त्वात आहेत. ती म्हणजे 1. ग्वाल्हेर घराणे, 2. आग्रा घराणे, 3. किराणा घराणे, 4. जयपूर घराणे, 5. पतियाला घराणे. वा मुख्य घराण्यांमधून नंतर पुढे आणखी काही घराणी देखील उदयास येवू लागली. ती म्हणजे भेंडीबाजार घराणे, दिल्ली घराणे, इंदौर घराणे, रामपूर सेहस्वान घराणे, मेवाती घराणे.

## घराण्याचे संगीतातील कार्य

घराण्यांच्या स्वरुपाविषयी वेगवेगळी मते आहेत. परंतु हे सर्व असूनदेखील घराण्यांनी गायनाच्या विवधि शैली, पध्दती जपून ठेवल्या हे कोणीही नाकारु शकत नाही. घराण्यांच्या कार्यविषयी काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

1. संगीताच्या अतिशय कठीण काळात घराण्यांनी संगीत कलेस जपले (मुखतः 17 व्या, 18 व्या शतकात)
2. गुरुशिष्य परंपरेमुळे संगीत शिक्षणाचा दर्जा वाढला.
3. संगीत शिक्षण घेण्यासाठी घराणी ही फार उपयुक्त ठरली. कारण संगीत शिक्षण घेण्यासाठी दुसरा मार्ग उपलब्ध नव्हता.

## आज संगीतातील घराण्यांची स्थिती

20 व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच भारतीय समाजजीवनात फार मोठे बदल घडले व सोबतच संगीत क्षेत्रात देखील विशेषतः वैज्ञानिक व यांत्रिक प्रगतीमुळे आकाशवाणी, ध्वनिमुद्रण आदी साधने प्रचारात आली. तसेच स्व. विष्णू दिगंबर पलुस्कर व पं. पलुस्करांनी 1901 साली लाहोर येथे गांधर्व महासंघाची स्थापना करुन सर्वसामान्य मुलांसाठी विद्यालयीन शिक्षणात संगीत शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. या विद्यालयातून हजारो विद्यार्थी संगीत शिकू लागली. शाळा – महाविद्यालयातून संगीताच्या अभ्यासक्रमाचा समावेश केला गेला. आज आणि भविष्यात घराण्यांबाबत विचार केल्यास घराणी भविष्यात टिकतील की घराणेदार गायकी संपूष्टात येईल याविषयी मतभेद आहेत.परंतु सद्यस्थितीत वैज्ञानिक प्रगतीच्या प्रचंड वेगात ती जुनी होऊन मागे पडत आहे. ''गायकीची विशिष्ट परंपरा, जशीच्या तशी दिर्घकाळ टिकवत ठेवणे'' हे घराणेदार गायकीचे प्रमुख कार्य आहे, परंतु पुढे येणाऱ्या काळात हे कदापिही शक्य नाही. कारण घराणी कशाला हवी? असे म्हणणारा बराच मोठा वर्ग या समाजात आहे आणि याचे कारण म्हणजे सध्या दुरदर्शन, संगणक, भ्रमणध्वनी आदी उपकरणांव्दोर सर्व गायकांचे गायन ऐकण्याची संधी मिळाली आहे. घरी बसून देश – विदेशातील कोणत्याही महान गायक – कलाकाराकडून व्हिडोओ कॉन्फरसींगव्दारे गायन शिकता येवू लागले आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे जसेच्या तसे शिक्षण मिळत आहे. कोण्या एका गुरु कडून त्याच घराण्याचे शिक्षण न घेता विविध गुरुंकडून शिक्षण घेवून त्या सर्वांमधील चांगल्या गोष्टी आत्मसात करुन आपली स्वतःची वेगळी शैली निर्माण करता येते.

## निष्कर्श

अंतिमतः वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यास घराण्यांचे भवितव्य काय? असा प्रश्न उपस्थित होतो. परंतु कितीही उत्तम गुरु असला तरी त्यांनी मुक्तहस्ते विद्यादान करायला हवे आणि आपल्या रितीनियमात शिष्यांना बंदिस्त करुन न ठेवता मोठ्या मनाने त्यांना सर्व प्रकारचे गायन त्यांच्या आवडीच्या कलाकाराकडून ऐकू व शिकू द्यावे. जेणे करुन त्या शिष्याला आपल्या गुरुप्रती आदर अजून वाढेल व त्याची संगीतातील रुची वृध्दींगत होवून तो त्याच्या मनाप्रमाणे निर्मिती करु शकेल आणि त्यांच्या या नवनिर्मित शैलीतूनच त्यांचे एखादे नवीन घराणे देखील निर्माण होवू शकेल.

## संदर्भ

1. मंगरुळकर, डॉ. नारायण (1992), 'संगीतातील घराणी आणि चरित्रे', स्वरसंपदा प्रकाशन, कोष्टीपूरा, सीताबर्डी नागपूर.
2. गोडसे, कै. मधुकर दृ (1988), 'संगीत अलंकार शास्त्र व कलाा मार्गदर्शन', संस्थापक गोडसे वाद्यवादन विद्यालय, पुणे.
3. बिडकर, डॉ. सुचेता (2010), 'संगीतशास्त्र विज्ञान' संस्कार प्रकाशन, 6/400, अभ्युदयनगर, काळाचौकी मुंबई.